2 4 SEP 2026

नाईट वॉच



# कर्मवीर भाऊराव पाटील यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक व शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू ज्योती जाधव यांच्या हस्ते विद्यापीठ परिसरातील कर्मवीर पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. त्याचप्रमाणे मुख्य प्रशासकीय इमारतीमध्येही कर्मवीरांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून त्यांनी अभिवादन केले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. सावळीराम घाणे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे, भूगोल अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, गणित अधिविभागाचे प्रमुख डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. मीना पोतदार, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. धनश्री शिंदे, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. अभिजीत पाटील, डॉ. सुधीर पोवार यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

2 4 SEP 2026

नाईट वॉच

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑस्ट्रेलियन विद्यापीठाच्या कुलगुरूंची शिवाजी विद्यापीठास भेट

## शैक्षणिक व संशोधकीय सहकार्याबाबत सकारात्मक चर्चा



**कोल्हापूर : ऑस्ट्रेलियातील द युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया च्या भारतातील शाखेने, म्हणजेच यू.डब्ल्यू.ए. (इंडिया) येथील कुलगुरू प्रा. अमित चाकमा यांनी आज शिवाजी विद्यापीठाला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी शिवाजी विद्यापीठासोबत शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात सहकार्य करण्याबाबत सकारात्मकता दर्शविली. विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन तसेच नव्या ज्ञानक्षेत्रांमध्ये सहकार्याच्या शक्यता यावेळी चर्चेत आल्या.**

दि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया या विद्यापीठाने अंधेरी (मुंबई) येथे भारतातील पहिला कॅम्पस सुरू केला असून त्या कॅम्पसचे डॉ. चाकमा हे कुलगुरू आहेत. त्यांच्यासह विद्यापीठाच्या अकादमिक व धोरणात्मक सहकार्य व्यवस्थापक डॉ. केलिथा चेरियन यांनीही शिवाजी विद्यापीठास आज सकाळी भेट दिली. कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी त्यांचे स्वागत केले.

कुलगुरू डॉ. चाकमा यांनी सुरवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्यास अभिवादन केले. त्यांनी शिवाजी विद्यापीठातील विविध सुविधा पाहण्यात मोठा रस दाखविला. विद्यापीठातील विविध अधिविभाग, संशोधन सुविधा, क्रीडा सुविधा यांसह विद्यापीठ परिसरातील जैवविविधता, विद्यापीठाने केलेले जलसंवर्धन इत्यादी पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. नजीकच्या कालखंडात शिवाजी विद्यापीठासमवेत निश्चितपणाने शैक्षणिक व संशोधकीय बंध निर्माण करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी या प्रसंगी दिली.

कुलगुरू डॉ. कामत यांनीही त्यांच्या भेटीविषयी सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले, या भेटीमुळे विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा सायन्ससारख्या भविष्यवेधी क्षेत्रांतील उपक्रम यांसाठी सहकार्याच्या नव्या संधी निर्माण होतील. शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी व संशोधकांना जागतिक स्तरावरील शैक्षणिक व्यासपीठ उपलब्ध होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या भेटीप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे हेही उपस्थित होते.

युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाविषयी थोडक्यात...

द युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया हे जगातील आघाडीच्या शंभर विद्यापीठांपैकी एक असून क्यूएस-२०२६ क्रमवारीत ७७ व्या स्थानी आहे. ऑस्ट्रेलियातील प्रतिष्ठित ग्रुप ऑफ एट (८) संशोधन विद्यापीठांपैकी ते एक आहे. भारतात कॅम्पस सुरू करणारे ते पहिले '८' विद्यापीठ आहे.

त्यांचे १३ विषय जगातील अव्वल ५० मध्ये गणले जातात. यूडब्ल्यूए-इंडियाचे कॅम्पस अंधेरी (मुंबई) आणि चेन्नई येथे आहेत. मुंबई कॅम्पससाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मंजुरीचे पत्र मिळाले असून चेन्नई कॅम्पसच्या मंजुरीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

2 4 SEP 2026

वर्तमान

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठासमवेत शैक्षणिक व संशोधकीय बंध निर्माण करण्यात येतील : कुलगुरू प्रा. अमित चाकमा



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** ऑस्ट्रेलियातील द युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया (UWA) च्या भारतातील शाखेने, म्हणजेच यू.डब्ल्यू.ए. (इंडिया) येथील कुलगुरू प्रा. अमित चाकमा *यांनी आज शिवाजी विद्यापीठाला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी* शिवाजी विद्यापीठासोबत शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात सहकार्य करण्याबाबत सकारात्मकता दर्शविली. विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन तसेच नव्या ज्ञानक्षेत्रांमध्ये सहकार्याच्या शक्यता यावेळी चर्चेत आल्या.

दि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया या विद्यापीठाने अंधेरी (मुंबई) येथे भारतातील पहिला कॅम्पस सुरू केला असून त्या कॅम्पसचे डॉ. चाकमा हे कुलगुरू आहेत. त्यांच्यासह विद्यापीठाच्या अकादमिक व धोरणात्मक सहकार्य व्यवस्थापक डॉ. केलिथा चेरियन यांनीही शिवाजी विद्यापीठास आज सकाळी भेट दिली. कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी त्यांचे स्वागत केले.

कुलगुरू डॉ. चाकमा यांनी सुरवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्यास अभिवादन केले. त्यांनी शिवाजी विद्यापीठातील विविध सुविधा पाहण्यात मोठा रस दाखविला. विद्यापीठातील विविध अधिविभाग, संशोधन सुविधा, क्रीडा सुविधा यांसह विद्यापीठ परिसरातील जैवविविधता, विद्यापीठाने केलेले जलसंवर्धन इत्यादी पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. नजीकच्या कालखंडात शिवाजी विद्यापीठासमवेत निश्चितपणाने शैक्षणिक व संशोधकीय बंध निर्माण करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी या प्रसंगी दिली.

कुलगुरू डॉ. कामत यांनीही त्यांच्या भेटीविषयी सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले, या भेटीमुळे विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा सायन्ससारख्या भविष्यवेधी क्षेत्रांतील उपक्रम यांसाठी सहकार्याच्या नव्या संधी निर्माण होतील. शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी व संशोधकांना जागतिक स्तरावरील शैक्षणिक व्यासपीठ उपलब्ध होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या भेटीप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे हेही उपस्थित होते.

युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाविषयी थोडक्यात...

द युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया हे जगातील आघाडीच्या शंभर विद्यापीठांपैकी एक असून क्यूएस-२०२६ क्रमवारीत ७७ व्या स्थानी आहे. ऑस्ट्रेलियातील प्रतिष्ठित 'ग्रुप ऑफ एट' (Go8) संशोधन विद्यापीठांपैकी ते एक आहे. भारतात कॅम्पस सुरू करणारे ते पहिले 'Go8' विद्यापीठ आहे. त्यांचे १३ विषय जगातील अव्वल ५० मध्ये गणले जातात. यूडब्ल्यूए-इंडियाचे कॅम्पस अंधेरी (मुंबई) आणि चेन्नई येथे आहेत. मुंबई कॅम्पससाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (UGC) मंजुरीचे पत्र मिळाले असून चेन्नई कॅम्पसच्या मंजुरीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

यूडब्ल्यूए-इंडियाकडून कॉम्प्युटर सायन्स, डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, बिझनेस मॅनेजमेंट, ग्लोबल बिझनेस, एंटरप्राइज अँड इनोव्हेशन हे पदवी अभ्यासक्रम, तसेच एमबीए आणि मास्टर ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी हे पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जात आहेत. आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संधी आणि उद्योगजगताशी जोडलेले शिक्षण हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

2 4 SEP 2026
सकाळ



# काळसेकर पुरस्कारांचे २९ सप्टेंबरला वितरण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या यंदाच्या काळसेकर पुरस्कारांचा वितरण समारंभ मंगळवारी (ता.२९) ज्येष्ठ साहित्यिक प्रा. वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते होणार आहे. ही माहिती मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली. यंदाचे सतीश काळसेकर काव्य पुरस्कार आणि ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार हे अनुक्रमे ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर आणि कवी रवी कोरडे यांना यापूर्वीच जाहीर केले आहेत. मंगळवारी (ता. २९) विद्यापीठाच्या गणित अधिविभागातील रामानुजन सभागृहात सकाळी साडेदहा वाजता पुरस्कार प्रदान समारंभ होणार आहे. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत असतील. आदित्य काळसेकर यांच्यासह काळसेकर कुटुंबीयही समारंभास उपस्थित असतील.

24 SEP 2026

जनप्रवास

# विद्यापीठाच्या काळसेकर पुरस्कारांचे २९ रोजी वितरण

जनप्रवास : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या सन २०२६ च्या काळसेकर पुरस्कारांचा वितरण समारंभ येत्या २९ सप्टेंबर रोजी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते होणार आहे. ही माहिती मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

**• मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांची माहिती**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारे २०२६ सालचे सतीश काळसेकर काव्य पुरस्कार आणि ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार हे अनुक्रमे ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर आणि कवी रवी कोरडे यांना यापूर्वीच जाहीर केले आहेत. ज्येष्ठ साहित्यिक, कवी, समीक्षक प्रा. वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २९) विद्यापीठाच्या गणित अधिविभागातील रामानुजन सभागृहात सकाळी १०.३० वाजता पुरस्कार प्रदान समारंभ आयोजित केला आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत असतील. आदित्य काळसेकर यांच्यासह काळसेकर कुटुंबीयही समारंभास उपस्थित राहणार आहेत.

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या काळसेकर पुरस्कारांचे २९ सप्टेंबरला वितरण

■ कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या २०२६ च्या काळसेकर पुरस्कारांचा वितरण समारंभ दि. २९ सप्टेंबर रोजी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते होणार आहे. ही माहिती मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारे २०२६ सालचे सतीश काळसेकर काव्य पुरस्कार आणि ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार हे अनुक्रमे ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर आणि कवी रवी कोरडे यांना यापूर्वीच जाहीर करण्यात आले आहेत. ज्येष्ठ साहित्यिक, कवी, समीक्षक प्रा. वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते येत्या मंगळवार, दि. २९ रोजी विद्यापीठाच्या गणित अधिविभागातील रामानुजन सभागृहात सकाळी १०.३० वाजता पुरस्कार प्रदान समारंभ आयोजित करण्यात आला आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत असतील. आदित्य काळसेकर यांच्यासह काळसेकर कुटुंबीयही समारंभास उपस्थित राहणार आहेत.

2 4 SEP 2026

तरुण भारत

# काळसेकर पुरस्काराचे २९ रोजी वितरण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या यंदाच्या काळसेकर पुरस्कारांचा वितरण समारंभ मंगळवार दि. २९ रोजी गणित अधिविभागातील रामानुजन सभागृहात सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने या पुरस्कार सोहळयाचे आयोजन केले जाते. यंदाचे सतीश काळसेकर काव्य पुरस्कार आणि ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार हे अनुक्रमे ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर आणि कवी रवी कोरडे यांना जाहीर झाले आहेत.

ज्येष्ठ साहित्यिक, कवी, समीक्षक प्रा. वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. पुरस्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत असणार आहेत. आदित्य काळसेकर यांच्यासह काळसेकर कुटुंबीयही समारंभास उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

2 4 SEP 2026

वर्तमान

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांच्या विकासासाठी महिला विकास कक्षाची आवश्यकता : प्रा.डॉ.प्रतिमा पवार




**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शिक्षण रोजगार व आरोग्य यांच्या सुविधाद्वारे राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात महिलांना समान संधी आवश्यक महाविद्यालयातून दिले जाणारे शिक्षण हे स्त्रीला सक्षमीकरण करण्याचे सर्वात प्रभावी साधन असून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी या प्रकारच्या महिला विकास कक्षाची आवश्यकता आहे. असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. प्रतिमा पवार यांनी केले. महावीर महाविद्यालयात महिला विकास कक्ष उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रोपास पाणी घालून या महिला विकास कक्षाचे उद्घाटन करण्यात आले.

डॉ. प्रतिमा पवार म्हणाल्या, स्त्री ही समाजाची खरी निर्माती असून तिच्या संस्कारातून कुटंब, समाज व राष्ट्राची प्रगती होती. स्त्रीचे सबलीकरण करणे म्हणजे स्त्रीला शिक्षण, रोजगार, आरोग्य, राजकीय, समाजिक व आर्थिक क्षेत्रात समान संधी मिळवून देणे. तिच्या मताचा आदर करणे, तिला निर्णय घेण्यास अधिकार देणे तसेच स्त्री-पुरुष भेदभाव विसरुन तिला तिची खरी ओळख मिळवून देणे हेच खरे सक्षमीकरण असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी श्रावणमास ऋतु हिरवा या अनुषंगाने महाविद्यालयाच्या प्रांगणात विविध उपक्रमही राबविण्यात आले. विविध वस्तुंचे प्रदर्शन व विक्रीसाठी स्टॉल्स उपलब्ध करुन दिले. त्यामध्ये कला कुसरीच्या वस्तु, पिशव्या, पर्स आर्टिफिशली ज्वेलरी, इंस्टंट पीठ, सजावटीच्या वस्तु, खाद्यपदार्थ अशा अनेक वस्तुंचा समावेश होता. विद्यार्थ्यांनींनी व महिला प्राध्यापकांनी हिरवे वस्त्र परिधान केले होते. तसेच विद्यार्थीनीमधून उत्कृष्ट व्यक्तीमत्व असलेली विद्यार्थीनी इ. १२ वी वाणिज्य-ब वर्गातील राजनंदीनी किरण पडवळ ही श्रावण क्वीन म्हणून निवडण्यात आली.

स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. कल्पना गंगातीरकर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. संध्या जाधव यांनी केला. आभार डॉ. अश्विनी कोटणीस यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. माधुरी रसाळ यांनी केले. या कार्यक्रमासाठी तसेच इतर सर्व प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 4 SEP 2026
तरुण भारत

लक्षवेधी

पर्यावरणपूरकतेचा संदेश : डॉल्बीमुक्त गणेशोत्सवाला हातभार

# साक्षीच्या गणेशोत्सव रीलची जिल्हा पोलिसांकडून दखल

**शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्ममेकिंग विभागाच्या साक्षी वाघमोडे हिने तयार केलेल्या रीलने डॉल्बीमुक्त व पर्यावरणपूरक गणेशोत्सवासंदर्भात, जनजागृती होत आहे. या रीलची जिल्हा पोलिसांनी दखल घेत ती आपल्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून प्रसारित केली आहे.**

- कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्याकडून साक्षीचे कौतुक
- शिवाजी विद्यापीठाच्या फिल्म मेकींग विभागाचे सहकार्य

## पर्यावरणपूरक उत्सव साजरा व्हावा हा उद्देश

**गणेशोत्सवातील डॉल्बीचा दणदणाट आणि त्यामुळे होणारे ध्वनीप्रदूषण टाळावे, पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या रीलमधून डॉल्बीला टाळून पारंपरिक वाद्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रभावी संदेश देण्यात आला आहे. या जनजागृतीपर रीलच्या स्क्रिप्टचे लेखन बी. ए. फिल्म मेकिंग कोर्सचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव आणि शिक्षक अनुप जत्राटकर यांनी केले. अवधूत चव्हाण याने संकलन केले.**

त. भा. प्रतिनिधी



साक्षी वाघमोडे

**कोल्हापूर :** डॉल्बीमुक्त आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा व्हावा, यासाठी कोल्हापूर जिल्हा पोलीस प्रशासनाकडून जनजागृती करण्यात येत आहे. या प्रयत्नांना साथ देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभागानेही पुढाकार घेतला आहे. याअंतर्गत साक्षीने तयार केलेल्या जनजागृतीपर रीलने पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश दिला जात आहे.

गणेशोत्सवाचा उत्साह असू द्या... पण डॉल्बीचा दणदणाट नको या संदेशातून ध्वनीप्रदूषणमुक्त, पर्यावरणपूरक आणि जबाबदारीने गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन या रीलमधून करण्यात आले आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी या अभिनव उपक्रमाबद्दल विभागाचे कौतूक केले आहे.

विद्यार्थ्यांनी फिल्म मेकिंगच्या अभ्यासक्रमातून आत्मसात केलेल्या दृक्-श्राव्य कौशल्याचा उपयोग सामाजिक जनजागृतीसाठी केला आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या आशयगर्भ रीलची कोल्हापूर जिल्हा पोलीस प्रशासनाने दखल घेत आपल्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून तिचा प्रसार केला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 4 SEP 2026

नाईट वॉच

# फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांकडून डॉल्बीमुक्त गणेशोत्सवाबाबत जनजागृती

कोल्हापूर : डॉल्बीमुक्त आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा व्हावा, यासाठी कोल्हापूर जिल्हा पोलीस प्रशासनाकडून जनजागृती करण्यात येत आहे. या प्रयत्नांना साथ देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभागानेही आपला वाटा उचलला आहे. याअंतर्गत विभागाची विद्यार्थिनी साक्षी वाघमोडे हिने तयार केलेल्या जनजागृतीपर रीलची जिल्हा पोलिसांनी दखल घेत ती आपल्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून प्रसारित केली आहे.

गणेशोत्सवातील डॉल्बीचा दणदणाट आणि त्यामुळे होणारे ध्वनीप्रदूषण टाळावे, तसेच पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या रीलमधून डॉल्बीला टाळून पारंपरिक वाद्यांना प्रोत्साहन देण्याचा



प्रभावी संदेश देण्यात आला आहे. या जनजागृतीपर रीलच्या स्क्रिप्टचे लेखन बी.ए. फिल्म मेकिंग कोर्सचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव आणि शिक्षक अनुप जत्राटकर यांनी केले. अवधूत चव्हाण यांनी संकलन केले. विद्यार्थ्यांनी फिल्म मेकिंगच्या अभ्यासक्रमातून आत्मसात केलेल्या दृक्-श्राव्य कौशल्याचा उपयोग सामाजिक जनजागृतीसाठी केला आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या आशयगर्भ रीलची कोल्हापूर जिल्हा पोलीस प्रशासनाने दखल घेत आपल्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून तिचा प्रसार केला.

'गणेशोत्सवाचा उत्साह असू द्या पण डॉल्बीचा दणदणाट नको!' या संदेशातून ध्वनीप्रदूषणमुक्त, पर्यावरणपूरक आणि जबाबदारीने गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन या रीलमधून करण्यात आले आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी या अभिनव उपक्रमाबद्दल विभागाचे अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सिंधुदुर्ग समाचार

2 4 SEP 2026

# फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांकडून डॉल्बीमुक्त गणेशोत्सवाबाबत जनजागृती



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** डॉल्बीमुक्त आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा व्हावा, यासाठी कोल्हापूर जिल्हा पोलीस प्रशासनाकडून जनजागृती करण्यात येत आहे. या प्रयत्नांना साथ देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभागानेही आपला वाटा उचलला आहे. याअंतर्गत विभागाची विद्यार्थिनी साक्षी वाघमोडे हिने तयार केलेल्या जनजागृतीपर रीलची जिल्हा पोलिसांनी दखल घेत ती आपल्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून प्रसारित केली आहे.

गणेशोत्सवातील डॉल्बीचा दणदणाट आणि त्यामुळे होणारे ध्वनीप्रदूषण टाळावे, तसेच पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या रीलमधून डॉल्बीला टाळून पारंपरिक वाद्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रभावी संदेश देण्यात आला आहे. या जनजागृतीपर रीलच्या स्क्रिप्टचे लेखन बी.ए. फिल्म मेकिंग कोर्सचे समन्वयक आणि शिक्षक अनुप जत्राटकर यांनी केले. अवधूत चव्हाण याने संकलन केले. विद्यार्थ्यांनी फिल्म मेकिंगच्या अभ्यासक्रमातून आत्मसात केलेल्या दृक्-श्राव्य कौशल्याचा उपयोग सामाजिक जनजागृतीसाठी केला आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या आशयगर्भ रीलची कोल्हापूर जिल्हा पोलीस प्रशासनाने दखल घेत आपल्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून तिचा प्रसार केला. https://www.instagram.com/reel/Dci_SN3jYEL/?igsi=MXd4cTBpN2JzaWV1Nw== अशी या रीलची लिंक आहे. 'गणेशोत्सवाचा उत्साह असू द्या पण डॉल्बीचा दणदणाट नको!' या संदेशातून ध्वनीप्रदूषणमुक्त, पर्यावरणपूरक आणि जबाबदारीने गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन या रीलमधून करण्यात आले आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी या विभागाचे अभिनंदन केले अभिनव उपक्रमाबद्दल आहे.

24 SEP 2026

पुण्यनगरी

# फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांकडून डीजेमुक्तीसाठी जनजागृती

**कोल्हापूर :** डीजेमुक्त आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा व्हावा, यासाठी कोल्हापूर जिल्हा पोलीस प्रशासनाकडून जनजागृती करण्यात येत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभागानेही या उपक्रमात वाटा उचलला आहे. याअंतर्गत विभागाची विद्यार्थिनी साक्षी वाघमोडे हिने तयार केलेल्या जनजागृतीपर रीलची जिल्हा पोलिसांनी दखल घेत ती आपल्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून प्रसारित केली आहे. गणेशोत्सवातील डॉल्बीचा दणदणाट आणि त्यामुळे होणारे ध्वनिप्रदूषण टाळावे, तसेच पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करावा, हा उपक्रमाचा उद्देश आहे. या रीलमधून डॉल्बीला टाळून पारंपरिक वाद्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रभावी संदेश देण्यात आला आहे. रीलच्या स्क्रिप्टचे लेखन कोर्सचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव आणि शिक्षक अनुप जत्राटकर यांनी केले. अवधूत चव्हाणने संकलन केले. विद्यार्थ्यांनी फिल्म मेकिंगच्या अभ्यासक्रमातून आत्मसात केलेल्या दृकश्राव्य कौशल्याचा उपयोग सामाजिक जनजागृतीसाठी केला आहे. कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी या अभिनव उपक्रमाबद्दल विभागाचे अभिनंदन केले आहे.

2 4 SEP 2026
सकाळ

# चित्रनगरीत विद्यार्थ्यांनी अनुभवले 'सेट'मागचे जग

## चित्रपट निर्मितीचे घेतले प्रत्यक्ष धडे

कोल्हापूर, ता. २३ : पडद्यावर दिसणारे गाव, वाडे, पोलिस ठाणे, रुग्णालय, महाविद्यालय, रेल्वे स्टेशन किंवा मंदिर प्रत्यक्षात कसे उभे केले जाते, याचा प्रत्यक्ष अनुभव शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन आणि बी.ए. फिल्म मेकिंग विभागाच्या विद्यार्थ्यांनी घेतला. कोल्हापूर चित्रनगरीतील विविध चित्रीकरण स्थळांना भेट देत विद्यार्थ्यांनी चित्रपट निर्मिती आणि कलादिग्दर्शनामागील सर्जनशीलतेचे बारकावे जाणून घेतले.

मास कम्युनिकेशन आणि बी.ए. फिल्म मेकिंग विभागातील प्रथम सत्राच्या विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय शैक्षणिक भेटीचे आयोजन झाले. अभ्यासक्रमातील चित्रपट निर्मितीच्या संकल्पना प्रत्यक्ष चित्रीकरणाच्या वातावरणात समजून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना या भेटीत मिळाली. चित्रनगरीचे कर्मचारी विक्रम वडर आणि सचिन कुडचे यांनी विद्यार्थ्यांना विविध लोकेशन्सची माहिती दिली.

दरम्यान, अभिनेते उमेश बोळके आणि बाल विष्णूची भूमिका साकारणारा बालकलाकार तक्षशील भोसले यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अनुप जत्राटकर आणि डॉ. कविता गगराणी यांनी मार्गदर्शन केले. समन्वयक डॉ. शिवाजी जाधव आणि कोल्हापूर चित्रनगरीचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप भांदिगरे यांचे सहकार्य मिळाले.

24 SEP 2026

जनप्रवास

# पीएचडी प्रवेश ऑनलाईन अर्ज करण्यास मुदतवाढ

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पीएच. डी. प्रवेशा ( २०२६-२७ ) साठी ऑनलाईन अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. सुधारित वेळापत्रकाप्रमाणे २३ ते २४ सप्टेंबर मध्यरात्री १२ वाजेपर्यंत विद्यार्थी अर्ज भरू शकतात. त्यामुळे पात्र असूनही ज्या उमेदवारांनी आपले अर्ज भरलेले नाहीत त्यांनी अधिकृत संकेतस्थळावर दिलेल्या मुदतीत प्रवेश शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरावयाचा आहे. २४ सप्टेंबरनंतर मुदतवाढ दिली जाणार नाही त्यामुळे विद्यार्थ्यांनी https:www.unishivaji.ac.in/admissaion/PhD-Admission-2026-27 या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज भरावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या सहीने परिपत्रक काढून केले आहे.

